# मी

**हरि नारायण आपटे**

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**मी : हरि नारायण आपटे**

© **प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८ ई वॉर्ड, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
मे, २०१२

**किंमत**
रुपये ४८०/-

---

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

---

माझा एक परममित्र
व
सहाध्यायी
कै. विष्णू बळवंत पंडित
यांच्या स्मरणार्थ अर्पण

**हरि नारायण आपटे**

# प्रास्ताविक

प्रस्तुत कादंबरी करमणूक पत्रांत प्रकरणश: प्रसिद्ध झाल्यास आज वीस वर्षे होऊन गेलीं. त्या वेळीं Servants of India Society, सेवासदन, Social Service League वगैरेंसारख्या संस्था अस्तित्वांत नव्हत्या; इतकेंच नव्हे, तर नुसत्या गर्भावस्थेंतसुद्धां नव्हत्या.

राजकीय व सामाजिक बंधनें आपल्या देशाच्या वाढीला खुंटवून टाकीत आहेत. तेव्हां त्या बंधनांना योग्य मार्गांनीं जितकें शैथिल्य आणतां येईल तितकें आणणें हें प्रत्येक सुशिक्षिताचें कर्तव्य आहे असें कित्येक महात्म्यांस त्यापूर्वी वीस वर्षे म्हणजे आज सुमारें चाळीस वर्षे झालीं वाटूं लागलें होतें. कित्येकांस त्याबद्दल अहर्निश निदिध्यास लागला होता. राजकीय बंधनांचें शैथिल्य संपादिलें तर आत्मविकास होण्यास मुळींच अवकाश लागणार नाही, म्हणून त्यांच्या संपादनाकरितां आपले सर्व प्रयत्न एकवटले पाहिजेत, असें अंत:करणपूर्वक वाटून सुशिक्षतांनीं आपलें तनमनधन त्या कार्यास वाहावें असा आग्रहाचा उपदेश कित्येकांकडून होई, तर दुसऱ्या कित्येकांकडून असें आग्रहानें प्रतिपादले जात असे कीं, सामाजिक बंधनांनीं आपण जखडलें गेलों असल्यामुळें आपल्या अंगीं राजकीय बंधनें शिथिल करण्याचे योग्य प्रयत्न करण्यास आवश्यक सामर्थ्य नाहीं, तीं बंधनें शिथिल होणें इष्टहि नाहीं. बाल्यावस्थेंत जसें बालसंगोपन इतरांनींच केलें पाहिजे, तसें आपल्या या सामाजिक बाल्यावस्थेंत आपलें संगोपन आपल्या रक्षणकर्त्यांनींच केलें पाहिजे. आपल्या अंगीं कार्यक्षमता आली कीं, राजकीय बंधनें घालणारे आपणच तीं बंधनें आपल्या क्षमतेच्या मानानें आवश्यक व इष्ट तितकीं शिथिल करतील. आज आपण पात्र नाहीं. तेव्हां आपले सर्व प्रयत्न समाजबंधनांचें शैथिल्य संपादन करण्याकडेच एकाग्रतेनें लाविलें पाहिजे. हे दोन पक्ष आपापल्या दृष्टीनें पाहतां एकमेकांवर आघात-प्रत्याघात करीत असतां तरुण पिढीच्या मनावर एवढाच परिणाम झाला कीं, दोनहि प्रकारच्या बंधनांचें

शैथिल्य एकाच वेळींसंपादन करण्यासाठीं सतत व समवेग प्रयत्नांची जरूरी आहे, अशी मनाची खात्री पटून उपाययोजनेकडे तिचें चित्त लागलें. या प्रयत्नांपैकीं मुख्य प्रयत्न एकीकडून समाजाच्या व दुसरीकडून सरकारच्या अज्ञानाचा नाश करण्यासंबंधाचा. समाजदृष्ट्या हें अज्ञान दोन प्रकारचें. एक शिक्षणाच्या अभावामुळें उत्पन्न झालेलें व दुसरें परंपरागत रूढीच्या अभिमानानें उत्पन्न झालेलें. राजकीय दृष्ट्याहि हें अज्ञान दोन प्रकारचें. एक लोकस्थिति कशी आणावी याचें शिक्षण नसल्यानें उत्पन्न झालेलें आणि दुसरें अधिकारमदानें उत्पन्न झालेलें. पहिल्या अज्ञानाचें अधिष्ठान मुख्यत: सामान्यजनसमूह व त्याचे ''पुराणमित्येव न साधु''असें वाटणारे पुढारी यांच्या ठिकाणीं. दुसऱ्या अज्ञानाचें अधिष्ठान सरकार व थोर सरकारी अधिकारी यांच्या ठिकाणीं. अर्थात् या चतुष्कोण अज्ञानाचा विध्वंस करण्याचें दुष्कर कार्य करण्यास उद्युक्त होऊन तशा प्रयत्नांस बिनदिक्कत लागणें हें एक प्रचंड साहस होय. कां कीं हें कार्य करण्याच्या मार्गांत चोहों बाजूंनीं विघ्नें येणार हें उघड होतें. आणि कशींहि विघ्नें आलीं तरी योग्य मार्गानें व तीं धैर्यानें दूर करण्याचे प्रयत्न – एके बाजूस लोकांकडून होणाऱ्या व दुसरीकडून सरकारी अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या निंदेची व छळाची गुमान न राखतां चालू ठेवणें आत्मत्यागावाचून शक्य नाहीं. केव्हां त्या विघ्नांचा जोर अधिक होऊन प्रयत्नकर्त्या व्यक्तीबरोबर संकटपरंपरा ओढवणार. त्या संकटपरंपरेला न भितां प्रयत्न चालविणें हें आत्मत्यागाचें खडतर व्रतच होय. असें व्रत चालविणारे व्रती निघाले पाहिजेत, असे विचार तरुण पिढींत जागृत झाल्याचीं सूक्ष्म चिन्हें दिसू लागल्या वेळची ही माझी कृति आहे. त्या चिन्हांचीं फलें जशीं या कृतींत कल्पिलीं आहेत तशीं उत्पन्न झालीं कीं नाहीं हें वीस वर्षांनंतर आपणच पाहात आहोंत.

पुणें, २० जुलै १९१६ — **– हरि नारायण आपटे**

# प्रकाशकाचे दोन शब्द

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतर भारतीय राष्ट्रीयत्वाचा व स्वत्वाचा स्फुलिंग कोळंगत चालला होता, परंतु पाश्चात्त्य शिक्षणाच्या 'वाघिणीचें दूध' पिऊन तरारलेल्या तरुणांनीं हा स्फुलिंग पुन्हा प्रज्वलित करण्याचा उद्योग आरंभिला. त्यांनीं त्याकरिता स्वार्थत्यागपूर्वक काम करण्याची शपथ घेऊन लोकशिक्षणासाठीं शिक्षण संस्था काढल्या व आम जनतेला जागृत करण्यासाठीं वृत्तपत्रें सुरू केलीं. पारतंत्र्यांचें जड जोखड झुगारून देण्यासाठीं राजकीय उत्थानाबरोबर आपल्यांतील कांहीं वेडगळ रूढींचेंहि भंजन झालें पाहिजे ही जाणीव या कार्यधुरीणांना झाली होती व त्याप्रमाणें त्यांचें कार्यहि चालू होतें. परंतु हें कार्य एकट्यादुकट्याचें किंबहुना एखाद्या दुसऱ्या पिढीचेंहि नसून त्यासाठी 'हातीं घ्याल तें तडीस न्या' या वृत्तीच्या स्नेहशील कार्यकर्त्यांची संतत धार लागली तरच ही राष्ट्रीयत्वाची ज्योत सतत तेवत राहील असेंहि त्यांना त्या वेळीं वाटूं लागलें होतें. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं इंग्रजी सत्तेचे पाश जास्त जास्त आवळूं लागले तेव्हां राष्ट्रीयत्वाची परंपरा चालविणाऱ्या स्वार्थत्यागी कार्यकर्त्यांची फारच गरज आहे, असें राजकीय व सामाजिक राष्ट्रधुरीणांना विचारविनिमयानंतर दिसून आलें.

हरिभाऊ आपटे यांनीं सामाजिक कार्यकर्त्यांना कार्यप्रवण करणारी आपली 'मी' ही कादंबरी १८९५-९६ च्या सुमारास आपल्या 'करमणूक' पत्रांतून क्रमश: प्रसिद्ध केली. हरिभाऊ आपटे आणि नामदार गोखले हे परमस्नेही आणि सामाजिक व राजकीय कार्यांतील अग्रणी असल्यामुळें त्यांचा कार्यकर्त्यांची परंपरा निर्माण करणारी संस्था असावी याबद्दल विचार झाला असल्याची शक्यता आहे. कारण सन १८९७ सालीं नामदार गोखले विलायतेंत असतांना त्या वेळीं तेथें शिक्षण घेत असलेले श्री. र. पु. परांजपे यांच्या जवळ अशी कार्यकर्त्यांची संस्था स्थापन करण्याची कल्पना त्यांनीं व्यक्त केल्याचें रँग्लर परांजपे यांनी ना. गोखले यांच्या चरित्रांतून नमूद केलें आहे. त्यावरून वरील विधानास पुष्टीच मिळते. पुढें १९०५ सालीं तर ना.

गोखले यांनी 'हिंद सेवक संघा' (Servants of India Society) ची स्थापना केली. भारतांत यानंतर या सोसायटीच्या धर्तीवर अनेक राजकीय आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या संस्था स्थापन झाल्या. तेव्हां अशा संस्थांचें स्फूर्तिस्थान 'मी' या कादंबरींत आहे असें म्हटलें असतां वावगें होणार नाहीं.

'मी' या कादंबरींतील शिवरामपंत व त्यांचे शिष्य भाऊराव यांच्या व्यक्तिरेखेवरून एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकांत महाराष्ट्रांत सामाजिक कार्यकर्त्यांची जी गुरुशिष्य जोडी तळपत होती तिची ओळख सहज होण्यासारखी आहे. ६०-७० वर्षांपूर्वीचें महाराष्ट्रांतील राजकीय आणि सामाजिक स्थितीचें हें चित्रण वास्तव व हृद्य तर आहेच, परंतु आजहि सामाजिक कार्यकर्त्यांना व संस्थांना कांटेकुटे आणि दगडगोटे यांतून वाटचाल करतांना मार्गदर्शक होणारें आहे. अशा 'मी' या ध्येयप्रवण सामाजिक कादंबरीचें हें पांचवें संस्करण मराठी वाचकांच्या व तरुण विद्यार्थ्यांच्या हातीं सुपूर्त करतांना आनंद होत आहे.

२५ मे १९२६ रोजीं आर्यभूषण मुद्रणालयावर अग्निप्रकोपाची आपत्ति ओढवली. तीतं इतर गोष्टींबरोबर हरिभाऊंचे ग्रंथहि आगीच्या भक्ष्यस्थानीं पडले. त्यामुळें १९२१ सालची 'मी'ची दुसरी आवृत्ति दुर्मिळ झालीं. हरिभाऊंच्या सर्व वाङ्मयाचे हक्क त्यांच्या अखेरच्या लेखानें सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीकडे आहेत व या सोसायटीच्या आर्यभूषण मुद्रणालयाकडे त्याच्या प्रकाशनाची व्यवस्था आहे. आर्यभूषण मुद्रणालय व पर्यायानें सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीवर या अग्निप्रलयानें ओढवलेल्या संकटांत भारतीय जनतेनें स्वयंस्फूर्तीनें मदत केली, त्यामुळेंच आर्यभूषण मुद्रणालय अग्निदिव्यांतून पुन्हा आपल्या पायावर उभें राहूं शकलें. मुद्रणालयानेंहि 'पुन:श्च हरि:ॐ' म्हणतांना आपलें कर्तव्य म्हणून हरिभाऊंच्या ग्रंथछपाईस अग्रस्थान दिलें. त्यामुळेंच 'मी'ची तृतीयावृत्ति १९२८ सालीं प्रसिद्ध झालीं. त्यानंतर कांहीं काळ ही कादंबरी उपलब्ध नव्हती ती १९५६ सालीं पुन्हा मुद्रित करण्यांत आली.

दि. ८ मार्च १९६४ रोजीं हरिभाऊंची जन्मशताब्दी करण्याचें ठरलें. महाराष्ट्र राज्य सरकार व महाराष्ट्रांतील साहित्य संस्था यांनीं महाराष्ट्रांत व अन्य ठिकाणींहि जन्मशताब्दी महोत्सवाची आंखणी केली व या आद्य आणि श्रेष्ठ कादंबरीकार कुलगुरुचा यथोचित सन्मान करण्याचें ठरविलें. दिल्ली या स्वतंत्र भारताच्या

राजधानींत शिक्षणमंत्री ना. छगला यांच्या अध्यक्षतेखालीं तर हैद्राबाद येथें महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. नाईक यांच्या अध्यक्षतेखालीं हे उत्सव पार पडले. पुणें महानगरपालिका या हरिभाऊंच्या कार्यक्षेत्रांतहि ३ मार्च १९६५ रोजीं त्या वेळचे साहित्यसंमेलनाध्यक्ष श्री. वा. वि. शिरवाडकर ऊर्फ कवि कुसुमाग्रज यांच्या अध्यक्षतेखालीं हा समारंभ आयोजून महानगरपालिकेनें आपली स्मृतिसुमनांजली वाहिली.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळानें हरिभाऊंच्या दुर्मिळ वाङ्मय प्रकाशनास आर्थिक साहाय्य केलें, त्यामुळेच हरिभाऊंचें समग्र वाङ्मय आज उपलब्ध झालें आहे. हरिभाऊंचें उपलब्ध वाङ्मय मागणीप्रमाणें आम्ही छापीत होतोंच, परंतु यावेळीं दुर्मिळ ग्रंथ छापण्याचा योग आला व तो साहित्य आणि संस्कृति मंडळानें घडवून आणला म्हणून आम्ही त्या मंडळाच्या सदस्यांचे व महाराष्ट्र राज्य सरकारचे आभारी आहों. 'मी' ही कादंबरी १९६४ सालीं छापून तयार होती, परंतु यंदा ती मुंबई विद्यापीठानें पदवी परीक्षेस लावल्यानें आज या पांचव्या आवृत्तीचा योग येत आहे. हरिभाऊंची ही ध्येयप्रधान कादंबरी विद्यार्थिवाचकांना अभ्यासपुस्तक नेमल्याबद्दल आम्ही मुंबई विद्यापीठाचे आभारी आहों. हरिभाऊंच्या संस्कारक्षम वाङ्मय पुनर्मुद्रित करण्याचा योग मराठी वाचकांच्या सहकार्यानें यावा हीच इच्छा.

– प्रकाशक